# राजगुरू महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाला विजेतेपद

राजगुरूनगर, दि. २२ (प्रतिनिधी) - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा संकुलाच्या सिंथेटिक ट्रॅकवर १३ ते १५ नोव्हेंबर दरम्यान झालेल्या पुणे जिल्हा क्रीडा विभाग समिती अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन मैदानी मुले व मुली स्पर्धांमध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने विजेतेपद प्राप्त केले. तर मुले व मुली या दोन्ही संघांनी ८ सुवर्ण, २ रौप्य आणि ३ कांस्यपदकांची कमाई करून सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाची विद्यार्थिनी संगीता शिंदे हिने ४०० मीटर धावणे, ४०० मीटर, ८०० मी, ४ बाय १०० रीले, ४ बाय ४०० रीले यात ३ वैयक्तिक व २ सांघिक सुवर्णपदके, ऐश्वर्या खळदकर हिने २१ किमी धावणेत सुवर्णपदक, १०००० मीटर धावणेत रौप्य, ४ बाय १०० रीले, ४ बाय ४०० रीलेत २ सांघिक सुवर्णपदके, अक्षय दरेकर याने भालाफेक, बांबु उडीत २ वैयक्तिक सुवर्णपदके, संदेश डांगले याने बांबू उडीत १ वैयक्तिक रौप्यपदक, जगदीश दरेकर याने भालाफेकीत १ वैयक्तिक कांस्यपदक, कोमल सावंत हिने ४०० मी धावण्यात कास्यपदक, ४ बाय ४०० रीलेत सांघिक सुवर्णपदक, रोहिणी पुंडगे याने लांब उडीत कांस्यपदक ४ बाय १०० रीले व ४ बाय ४०० रीलेत २ सांघिक सुवर्णपदके आणि कांचन सावंत हिने ४ बाय १०० रीलेत सांघिक सुवर्णपदकाची कमाई केली.

या खेळाडूंचे व क्रीडा संचालक प्रा. प्रतिमा लोणारी यांचे अभिनंदन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले आहे.



**पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा संकुलाच्या सिंथेटिक ट्रॅकवर झालेल्या क्रीडा स्पर्धेत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश मिळवले.**